ePaper

| वर्ष - 7 | अंक - 276 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 22 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## मराठा समाजाला आर्थिकदृष्ट्या मागास म्हणता येणार नाही- उच्च न्यायालय



### आतील पानांत


- पुण्याला मिळणार अतिरिक्त पाणी!
- मागची दहा वर्षे ट्रेलर, पिक्चर अजून बाकी
- शेतकरी आंदोलनाला गालबोट?
- विराट कोहलीची क्रिकेटमधून निवृत्ती


# पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीत चढाओढ

# अजितदादा विरुद्ध रोहितदादा!

## एकाच दिवशी एकाची आढावा बैठक अन् दुसऱ्याचा दौरा

। पिंपरी । महाईन्यूज

**स्वार्थापोटी पक्षांतर करणारे अजित पवार यांचा भाजपात वट आहे, असे वाटत होते. पण आता असं काही दिसत नाही. त्यांना लोकसभेच्या चारच जागा मिळणार असल्याची चर्चा आहे. पूर्वीप्रमाणे त्यांचा वट राहिला नाही. त्यांचा दिल्लीतील संपर्क कमी पडत आहे. विधानसभेला देखील त्यांना वीस जागा मिळतील, किंवा त्यांना भाजपाच्या चिन्हावर लढा, अन्यथा वेगळं लढा, असे सांगितले जाईल, अशी परिस्थिती आहे. लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाला दोन्ही पक्षांची गरज आहे. तरीही, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचे महत्व कमी केले जात आहे. लोकसभेनंतर त्यांची किंमत काय होईल, हे सांगता येत नाही, असं रोहित पवार म्हणाले.**



> काकी (सुनेत्रा पवार) बारामतीमधून लढणार आहेत, असे बोलले जात असले तरी मला वाटत नाही, तसे अजून ठरले असेल. आत्या (सुप्रिया सुळे) कायमच या मतदार संघातून निवडणूक लढवत आल्या आहेत. असे असले तरी कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात दोन वेगवेगळ्या भूमिका असतात. याबाबत पवार साहेब जो निर्णय घेतील, तो मान्य करुन पुढील दिशा ठरवली जाईल.
>
> **- रोहीत पवार,**
> आमदार, राष्ट्रवादी शरद पवार गट.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पिंपरी-चिंचवड शहर कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत रोहित पवार बोलत होते. यावेळी शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत आदी पदाधिकारी उपस्थित होते. विशेष म्हणजे, एकाच दिवशी अजित पवार आणि शरद पवार गटाकडून शहरात शक्तीप्रदर्शन करण्यात आले. रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेतली आणि आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेतली.

तर दुसरीकडे, अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आढावा बैठक घेतली. त्यामुळे शहरात अजितदादा विरुद्ध रोहीतदादा असे चित्र निर्माण झाले आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा जेव्हा शहरात येतात तेव्हा त्यांच्या अवती भवती ठेकेदारांचे कोंडाळे असते. ही मलिदा गँग दादांना सामान्य नागरिकांपर्यंत पोहचू देत नाही.

आता ही गँग भाजपात गेली आहे. अध्यक्ष तुषार कामठे यांच्या विधानावर दादांना प्रतिक्रिया द्यावी लागते, हीच शरद पवार यांची ताकद आहे, अशा शब्दांत आमदार रोहित पवार यांनी घणाघाती टीका केली.

### पार्थ पवार यांच्या उमेदवारीबाबत काहीही होवू शकते...

**» पार्थ पवार याच्या उमेदवारीबाबत काहीही होऊ शकते. लोकसभेला ते उभे राहणार असतील तर शिरुरमध्ये शक्यता कमी आहे. बारामती आणि नगर येथून उमेदवारी मिळू शकते. तसेच, शरद पवार यांनी अजित पवार यांच्यासाठी काय केलं हे एका परिवारातील सदस्य म्हणून आम्ही स्वतः पाहिलं आहे. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाला असं आम्हाला वाटत नाही. तसेच, युगेंद्र पवार हा शरद पवार यांच्या कार्यालयात आज गेला आहे. त्याठिकाणी तो काय बोलतो, त्यावर पुढील वाटचाल ठरेल. तो साहेबांना साथ देत असेल, तर त्याचं स्वागत आहे, असेही रोहीत पवार म्हणाले.**

# मोरवाडी येथे भंगाराला भीषण आग

## परिसरात धुराचे लोट : सुदैवाने जीवीतहानी नाही

। पिंपरी । महाईन्यूज ।

मोरवाडी येथील न्यायालयाच्या जुन्या इमारती मागील अमृतेश्वर सोसायटी जवळ प्रचंड मोठी आग लागली आहे. रबर, प्लॅस्टिक, भंगार माल गोळा करून साठवलेले मोठे ढीग पेटले आहेत. त्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धूर दिसत होता.

चोरीचे टायर, केबलचा बेकायदा साठा या ठिकाणी असून त्याला आग लागली आहे. ऑईल भरलेले बॅरल पेटल्याने त्याचा मोठा स्फोट होत असून अवकाळ धुराने काळवंडले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भितीची वातावरण आहे. महापालिकेच्या अग्निशामक विभागाचे बंब दाखल झाले आणि आग आटोक्यात आणली.

ही घटना बुधवारी (दि.२१) दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास घडली. बेकायदा प्लॅस्टिक, भंगार साठ्याला आग लागली आहे. या आगीमुळे मोठ्या प्रमाणात धूर झाला असून धुराचे लोट आकाशात उडत आहेत.

दरम्यान या धुरामुळे अमृतेश्वर कॉलनी, म्हाडा कॉलनी, अजमेरा कॉलनी तसेच मोरवाडी परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.



### नागरिक भयभीत...

» रबराचे स्क्रॅप मटेरिअल जास्त असल्याने धुराचे लोळ मोठ्या प्रमाणात उडाले. स्थानिक तसेच, इतर नागरिकांनी गर्दी केल्याने पोलिसांना गर्दी हटविण्यासाठी सौम्य लाठीमार करावा लागत होता. परिणामी, परिसरातील नागरिक भयभीत झाले होते.

# पुण्याला मिळणार अतिरिक्त पाणी!

## धरणाची उंची वाढवण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांचे निर्देश

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मुळशी धरणाखालील मुळशी परिसरातील गावांसह पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण क्षेत्रातील पश्चिम भागात वाढत असणाऱ्या लोकसंख्येसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणे गरजेचे आहे. याद्दष्टीने पुढील 30 वर्षांचा विचार करून मुळशी धरणाची उंची वाढवावी.**



तसेच मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या टप्पा 1 आणि 2 च्या माध्यमातून होणाऱ्या कामांसाठी टाटा पॉवर कंपनीबरोबर सामंजस्याने उपाययोजनांवर अंमलबजावणी करावी, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारयांनी दिले.उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयातील त्यांच्या दालनात मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना टप्पा एक व टप्पा दोन मधील अडचणी दूर करण्यासाठी बैठक झाली. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. मुळशी धरणातून अतिरिक्त पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने टाटा पॉवर कंपनीचे अधिकारी सकारात्मक असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मुळशी आणि पुणे परिसरातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढण्यासाठी मुळशी धरणाची उंची एक मीटरने वाढविल्यास अतिरिक्त पाणी उपलब्ध होऊ शकते. यासह धरणाच्या मृतसाठ्यामधील पाण्याचा वापर करता आल्यास पाण्याची वाढीव मागणी पूर्ण होईल. टाटा पॉवर कंपनीच्या सहकार्याने या कामास प्राधान्य देण्यात यावे.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, हिंजवडीसह कोळवण खोऱ्यातील गावांमध्ये येत्या तीन वर्षात पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पाणीपुरवठा योजनांची तातडीने अंमलबजावणी करावी. त्यासाठी मुळशी धरणाची उंची एक मीटरने वाढविण्यात यावी. उंची वाढविल्यामुळे पाण्याखाली जाणाऱ्या जमिनीपैकी 80 टक्के जमीन टाटा पॉवर कंपनीच्या क्षेत्रातील असून ती विनामोबदला देण्याची विनंती करण्यात यावी. उर्वरित 20 टक्के जमीन शासनाच्या वतीने अधिग्रहण करावी. यासाठी जमीनधारकांना योग्य मोबदला देण्यात यावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेंतर्गत मंजूर कामांबाबत टाटा पॉवर कंपनीने हरकत घेतल्याने काम थांबले होते. या कामांना वेग देण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जलसंपदा विभागास प्रस्ताव द्यावा. जलसंपदा विभागाने आवश्यक पाण्याचे आरक्षण जाहीर करून याबाबत टाटा पॉवर कंपनीला लेखी कळवावे. तसेच पौड येथील पाणीपुरवठा योजनेंतर्गत उभारण्यात येणाऱ्या जलशुद्धीकरण केंद्रासाठी 'पीएमआरडीए'ने एक एकर जागा उपलब्ध करून दिली आहे. याठिकाणी पुरेशा क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यासाठी शेजारी असणाऱ्या आणखी चार एकर जागेची आवश्यकता आहे. पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या सहकार्याने 'पीएमआरडीए'ने ही जागा अधिग्रहण करून उपलब्ध करून घ्यावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.मुळशी धरणाखालील मुळशी परिसरातील गावांसह पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण क्षेत्रातील पश्चिम भागात वाढत असणाऱ्या लोकसंख्येसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणे गरजेचे आहे. याद्दष्टीने पुढील 30 वर्षांचा विचार करून मुळशी धरणाची उंची वाढवावी.

### उपाययोजनांवर अंमलबजावणी करा

मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या टप्पा 1 आणि 2 च्या माध्यमातून होणाऱ्या कामांसाठी टाटा पॉवर कंपनीबरोबर सामंजस्याने उपाययोजनांवर अंमलबजावणी करावी, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारयांनी दिलेअजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयातील त्यांच्या दालनात मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना टप्पा एक व टप्पा दोन मधील अडचणी दूर करण्यासाठी बैठक झाली. मुळशी धरणातून अतिरिक्त पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने टाटा पॉवर कंपनीचे अधिकारी सकारात्मक असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मुळशी आणि पुणे परिसरातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढण्यासाठी मुळशी धरणाची उंची एक मीटरने वाढविल्यास अतिरिक्त पाणी उपलब्ध होऊ शकते.

# निवडणुकीत महायुतीच्या जागावाटपाचे सर्वाधिकार कोणाला?

## आताच सर्व काही उघड करणार नाही : सुनील तटकरे

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महायुतीमधील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष यांची एकत्रित बैठक होईल. त्यानंतर दिल्ली येथे देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत बैठक होऊन मग लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीचे जागावाटप ठरेल.**



अशी स्पष्टोक्ती राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी बुधवारी केली. पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेसची आढावा बैठक झाल्यानंतर प्रदेशाध्यक्ष तटकरे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.ते म्हणाले की, महाराष्ट्रातील प्रत्येक लोकसभा मतदारसंघाची विद्यमान स्थिती, पक्षीय बलाबल आणि ताकद पाहून जागांची मागणी केली जाणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोग, त्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निर्णय तसेच आता पक्ष आणि निवडणूक चिन्ह मिळाल्यानंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबा सिद्दीकी, संभाजी ब्रिगेडचे अनेक कार्यकर्ते यांचा पक्षप्रवेश होत आहे. याशिवाय महाविकास आघाडीतील घटक पक्षांमधूनही राष्ट्रवादीमध्ये अनेक प्रवेश लवकरच होतील. त्यामुळे आम्ही घेतलेला निर्णय योग्य असल्याचे सिद्ध होत आहे. माझे बंधू आणि मी २०१४ पासून राजकारणातून वेगवेगळे झालो आहोत. त्यामुळे ते आताच सोडून गेले, अशा वदंता मुद्दामहून पसरवल्या जात आहेत. राजकारणामुळे कुटुंबात फूट पडणे हे भारतीय राजकारणात नवीन नाही, असेही तटकरे म्हणाले. शरद पवार यांनी पक्षाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांचा राजीनामा सर्वानुमते स्वीकृत करायचा. त्यांच्या जागी कोणाला नेमायचे आहे. त्याचे नावही एकमताने ठरविण्यात आले होते. सर्वकाही आनंदाने दिले असते त्याकरिता पक्ष आणि कुटुंब का फोडले?, असे म्हणणाऱ्यांना पक्षात राष्ट्रीय नेतृत्व करण्याची संधी दिली होती. त्यानंतरही पवार यांनी आपला राजीनामा मागे का घेतला?, कुठे आणि कधी काय-काय झाले याची सर्व माहिती मला आहे. मात्र, आताच सर्व काही उघड करणार नाही, असे तटकरे यांनी सांगितले. पक्षाची घटना, संघटना आणि आमदार आमच्यासोबत आहेत. त्यामुळे अदृश्य शक्ती म्हणणाऱ्यांकडे बोलण्यासारखे आणि करण्यासारखे काही नाही, अशा शब्दांत तटकरे यांनी खासदार सुप्रिया सुळे यांना फटकारले. ल्ली येथे देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत बैठक होऊन मग लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीचे जागावाटप ठरेल.

### सुनेत्रा पवारांनी बारामतीमधून लढावे

सुनेत्रा पवार यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवावी, अशी मागणी मतदार संघातून, जनतेमधून आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांमधून होत आहे. हा मतदारसंघ गेली अनेक वर्षे राष्ट्रवादीकडे असल्याने या जागेची मागणी आम्ही करणार आहोत. महायुतीचे जागावाटप झाल्यानंतर बारामतीमधील उमेदवार जाहीर केला जाईल. कधीतरी पहिली निवडणूक लढवावी लागतेच, त्याशिवाय अनुभव कसा येणार?, सुप्रिया सुळे यांनी पहिली निवडणूक लढविली होती, तेव्हा त्यांच्याकडे तरी कुठे अनुभव होता, असाही टोला तटकरे यांनी खासदार सुळे यांना लगावला.

# शहरात 11 आघाड्यांची जम्बो कार्यकारिणी सज्ज

# ‘महासत्ता भारत’साठी भाजपाचा ‘निर्धार’!

## शहराध्यक्ष शंकर जगताप : युवाशक्तीला दिशा देण्यासाठी पुढाकार घ्या!

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशाच्या युवाशक्तीला दिशा देण्याची जबाबदारी सर्वांची आहे. नागरिकांच्या वैयक्तिक सहभागातूनच राष्ट्र उभारणी होते. विकसित भारताच्या संकल्पनेला प्राधान्य देऊन उद्दिष्ट पूर्तीसाठी ‘विकसित भारत @ २०४७’ संकल्पनेसाठी प्रत्येकाने आपल्या विचारांच्या कक्षा ओलांडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधानपदावर विराजमान करून भारत महासत्ता होण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.**



भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) आयोजित नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा आचार्य अत्रे सभागृह, नेहरूनगर येथे मंगळवारी पार पडला. यावेळी, भाजपा शहराध्यक्ष शंकरभाऊ जगताप यांच्या हस्ते भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा, भाजपा महिला मोर्चा, सांस्कृतिक प्रकोष्ठ, बेटी बचाव बेटी पढाओ, किसान मोर्चा, वैद्यकीय प्रकोष्ठ, दिव्यांग सेल, ट्रान्सपोर्ट सेल, अल्पसंख्यांक मोर्चा, जैन प्रकोष्ठ, कामगार मोर्चाच्या जम्बो कार्यकारिणी जाहीर करण्यात आल्या. तसेच, विविध प्रकोष्ठचे ४५० हून अधिक नवनियुक्त पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र देवून सन्मानित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी, प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, आमदार महेशदादा लांडगे, आमदार उमाताई खापरे, मावळ लोकसभा संयोजक सदाशिव खाडे, वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रवक्ते राजू दुर्गे, सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मडेगिरी, अजय पाताडे, संजय मंगोडेकर, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे आदी उपस्थित होते. शंकर जगताप पुढे म्हणाले, मोदीजींच्या गॅरंटीला सर्वांनी प्रतिसाद दिला आहे. भारताचे जागतिक स्तरावरील स्थान मजबूत झाले आहे. भारत आता जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून जगातील सर्वात शक्तिशाली देशांपैकी एक म्हणून उदयास पावत आहे. आपले ध्येय, संकल्प विकसित भारतासाठी असले पाहिजे, याद्वारे सुसंस्कारित, बुद्धिमान, अशी युवा पिढी तयार होईल आणि आगामी काळात देशाचे नेतृत्व करेल, देशाला योग्य दिशा देईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरचिटणीस संजय मंगोडेकर यांनी केले.

> “ देशाच्या विकासासाठी लोकचळवळ होणे गरजेचे आहे. भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र निर्मीती आणि २०२७ पर्यंत जगातील तिसरी आर्थिक महासत्ता करण्याचा संकल्प पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी केला आहे. आगामी लोकसभा निवडणुक राष्ट्हितासाठी महत्वाची असून ४०० हून अधिक जागांवर भाजपाला विजयी करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधानपदी विराजमान करायचे आहे. याकरीता बूथ स्तरावर संघटना बळकट करून पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी आपली जबाबदारी स्विकारून केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती नागरिकांनापर्यंत पोहोचविण्यात येत आहे.
>
> **-शंकर जगताप,**
> शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

# लोकसभा निवडणुकीत महायुतीचे ४५ उमेदवार जिंकणार!

## आढावा बैठक : राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचा विश्वास

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात होणाऱ्या आगामी लोकसभा निवडणुकीत केवळ विकासकामांच्या जोरावर महायुतीचे 45 पेक्षाही अधिक उमेदवार निवडून येणार असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पिंपरी-चिंचवडच्या वतीने (शहर-जिल्हा) निगडी येथे बुधवारी पक्षाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. तेव्हा तटकरे बोलत होते..**

या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण, ओबीसी प्रदेशाध्यक्ष कल्याणकाका आखाडे, माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर योगेश बहल, मंगला कदम, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर, माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, युवक शहराध्यक्ष शेखर काटे आदींसह पक्षाचे पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तटकरे यांनी शहरातील राष्ट्रवादी पक्षाचे सर्व सेल अध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष, फ्रंटल तसेच बूथ कमिटी यांच्या कामकाजाची पूर्ण माहिती घेतली. पिंपरी, चिंचवड व भोसरी विधानसभा अंतर्गत येणाऱ्या सर्व एकूण बूथ, त्याची रचना याबाबत सविस्तर माहिती घेऊन सूचना दिल्या. उपमुख्यमंत्री तसेच राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहरात



केलेल्या विकासकामांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. देशाचा झपाट्याने होणारा विकास तसेच राज्यात महायुतीच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून अजित पवार घेत असलेले कष्ट नाकारून चालणार नाही. त्यामुळे राष्ट्रवादी पक्षातील जास्तीत जास्त उमेदवार निवडून असनून पक्षाला बळकटी देण्यासाठी सर्वंकष प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षा खा. तटकरे यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी रुपाली चाकणकर आणि सुरज चव्हाण यांनीही मार्गदर्शन केले.

**शिरुर, मावळमध्ये विजय आपलाच : अजित गव्हाणे**

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील लोकसभा निवडणुकीच्या सुरू असलेल्या तयारीचा सविस्तर आढावा सादर केला. बुथनिहाय सुरु असलेली तयारी, मतदार याद्या, भाग याद्या यासंदर्भात सुरू असलेली तयारी, कार्यकर्त्यांमध्ये निवडणुकीसंदर्भात असलेला उत्साह या बाबी स्पष्ट करतानाच तिन्ही विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार अधिकाधिक मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास गव्हाणे यांनी व्यक्त केला. मावळ आणि शिरूर मतदारसंघातील महायुतीचा कोणीही उमेदवार असला तरी त्याचे काम चांगल्यापद्धतीने करून विजय आपलाच होणार, अशी खात्री गव्हाणे यांनी व्यक्त केली.




**निवडणूक रोख्यांची केंद्राची योजना सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरवली. बड्या कंपन्या वा शक्तींनी आर्थिक बळाच्या जोरावर सरकारच्या निर्णयप्रक्रियेवर प्रभाव टाकू नये, यासाठी जी खंबीर भूमिका घेतली ती देशाला फार मोठा दिलासा देणारी आहे. आपले सर्वोच्च न्यायालय लोकशाहीचा एक भक्कम आधारस्तंभ म्हणून अद्यापही काम करीत आहे, हे या निर्णयातून दिसून आले.**

# साट्यालोट्याच्या योजनेला दणका

राजकीय पक्षांना उद्योगधंद्यांनी निधी देणे, ही काही नवी गोष्ट नाही. अगदी स्वातंत्र्यलढ्याच्या काळातही राजकीय पक्षांना काही व्यापारी घराण्यांनी विविध प्रकारे मदत केलीच आहे. त्यानंतरही वेगवेगळ्या प्रकारे हा ओघ चालू राहिला. परंतु त्याला यंत्रणात्मक स्वरूप देताना सर्वांत वादग्रस्त ठरलेली योजना म्हणजे २०१७ मध्ये आलेली केंद्र सरकारची 'इलेक्टोरल बॉण्ड्स'ची (निवडणूक रोखे) योजना.या योजनेला अनेकांनी उद्योजक व पुढारी यांच्यातले साटेलोटे म्हणजेच 'तुम्ही माझी पाठ खाजवा, मी तुमची खाजवतो' असे लेबल लावले होते. ही योजना बड्या उद्योगसंस्था आणि राजकीय पक्षांमधील एक परस्परांचे हितसंबंध सांभाळणाऱ्या व्यवस्थेला प्रोत्साहन देत होती. त्यामुळे विरोधी पक्षांपेक्षा सत्ताधारी पक्षाचे अधिक फावले.



निवडणूक रोखे योजनेच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२अंतर्गत दाखल करण्यात आल्या होत्या. याचिकांमध्ये 'वित्त कायदा २०१७' च्या तरतुदींनाही आव्हान देण्यात आले. त्याचबरोबर 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा-१९३४', 'लोकप्रतिनिधी कायदा-१९५१', 'प्राप्तिकर कायदा-१९६१' यांच्या तरतुदीतही बदल करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला. त्यामध्ये 'माहिती तंत्रज्ञान कायदा' आणि 'कंपनी कायदा-२०१३' चाही समावेश होता. केंद्र सरकार याबाबत प्रचंड उत्साही असताना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जानेवारी २०१७ मध्ये अर्थमंत्रालयातील संयुक्त सचिवांना पत्र लिहून या योजनेबद्दल आपली काही निरीक्षणे सादर करताना काही मुद्यांवर हरकत घेतली होती. विशेषतः देणगीदाराचा तपशील गोपनीय ठेवणे हे उघडउघड पारदर्शित्वाच्या तत्त्वालाच मुरड घालणारे आहे, यावर बोट ठेवले होते. हा आक्षेप खरेतर रास्त होता. मात्र, त्यावर "रिझर्व्ह बँकेला या योजनेचा मूळ उद्देशच समजला नाही," असे नमूद करणारे पत्र मंत्रालयाने उत्तरादाखल पाठवले. रिझर्व्ह बँकेने निवडणूक रोखे योजना केंद्रीय मंडळासमोर चर्चेसाठी ठेवली. समितीने या योजनेबाबत गंभीरपणे काही आक्षेप नोंदवले. रिझर्व्ह बँकेने सप्टेंबर २०१७ मध्ये अर्थमंत्र्यांना निरीक्षणे कळवली होती. दरम्यान, मे २०१७ मध्ये निवडणूक आयोगाने कायदा आणि न्याय मंत्रालयालाही पत्र लिहिले की, वित्त कायद्यान्वये प्रस्तावित करण्यात आलेल्या माहिती तंत्रज्ञान कायदा, लोकप्रतिनिधी कायदा आणि कंपनी कायद्यातील प्रस्तावित सुधारणा प्रत्यक्षात आल्यास राजकीय पक्षांच्या वित्त/निधीच्या पारदर्शकतेवर गंभीर परिणाम होतील. रोख्यांद्वारे देणग्या मिळाल्यास त्या उघड करणे बंधनकारक नसेल तर, हे नक्कीच प्रतिगामी पाऊल ठरेल. तरीही दोन जानेवारी २०१८ रोजी अर्थमंत्रालयाने 'आरबीआय कायद्या'च्या कलम ३१(३) अंतर्गत निवडणूक रोखे योजना २०१८ अधिसूचित केली. निवडणूक रोखे 'प्रॉमिसरी नोट'च्या स्वरूपात जारी केले गेले. त्यावर खरेदीदाराच्या नावाचा उल्लेख नव्हता. यामुळे पुढील व्यक्तींना रोखे खरेदी करणे शक्य होते - १) भारताचा नागरिक, २) भारतात स्थायिक झालेला व्यक्ती.यातील 'व्यक्ती'मध्ये अ) एक व्यक्ती एकट्याने किंवा इतर व्यक्तींसह संयुक्तपणे समाविष्ट आहे, तसेच (ब) हिंदू अविभक्त कुटुंब, (क) एखादी कंपनी (ड) छोटी संस्था (फर्म) (इ) संघटना किंवा संस्था (ई) वरीलपैकी कोणत्याही श्रेणीत न बसणारी, पण न्यायाच्या कक्षेत येणारी व्यक्ती (फ) अशा व्यक्तीच्या मालकीची किंवा तिने नियंत्रित केलेली कोणतीही एजन्सी, कार्यालय किंवा शाखा.तसेच, खरेदीदाराने दिलेली माहिती संबंधित बँकेने गोपनीय ठेवायला हवी आणि केवळ न्यायालयाच्या किंवा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने मागणी केल्यावर उघड करावी, असा उल्लेख होता.

## संपादकीय »

### वाईटांचा वसंतोत्सव!

***तृणमूल काँग्रेसच्या स्थानिक नेत्याने अनेक मजूर महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.***

संदेशखाली प्रकरणाची बरोबरी मणिपूरशी करण्याचा अतिउत्साही भाजप खासदारांचा प्रयत्न सर्वोच्च न्यायालयाने हाणून पाडला असला तरी त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य अजिबात कमी होत नाही. संदेशखाली हे पश्चिम बंगालची राजधानी कोलकातापासून शंभरभर किलोमीटरपेक्षाही कमी अंतरावर असलेले मागास ठिकाण. त्या परिसरात तृणमूल काँग्रेसच्या स्थानिक नेत्याने अनेक मजूर महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. त्याच्यावरील कारवाईसाठी त्यामुळे तेथे आंदोलन झाले आणि स्थानिक भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी हा मुद्दा लावून धरला. भाजपने यात विशेष लक्ष घातले याचे साधे- आणि अर्थातच महत्त्वाचे- कारण म्हणजे संदेशखाली कथित अत्याचार प्रकरणातील आरोपी. त्याचे नाव शाजहान शेख. आपल्याकडे शहरे वगळता अन्यत्र अनेक प्रांतांत स्थानिक राजकीय दांडगेश्वरांची हुकूमत असते. पक्ष कोणताही असो.

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर अयोध्येतील बहुप्रतीक्षित मंदिरात रामलल्लाची प्रतिष्ठापना केल्यावर आता सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशात संभळ येथे 'कल्की धाम मंदिरा'चेही भूमिपूजन केले. मात्र, त्याचवेळी त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक प्रचाराला नवी दिशाही दिली, त्याचे महत्त्व अधिक आहे.

# सुसाटलेले नि भरकटलेले!

'कालचक्र बदलले असून, नवे युग अवतरले आहे!' हे त्यांचे उद्‌गार 'आपण स्वत: युगप्रवर्तक आहोत,' असा अहंभाव मिरवणारेच होते. शिवाय, एकीकडे देशात मंदिरे उभारली जात असली, तरी 'भारतरूपी मंदिर' उभारण्याची जबाबदारी आपल्यावर साक्षात परमेश्वरानेच सोपवली आहे!' असेही त्यांनी ठासून सांगितले. तर मंगळवारी काश्मीरमध्ये बोलताना त्यांनी सनातन धर्माचा मुक्तकंठाने जयजयकार केला. पंतप्रधान अशा रीतीने या निवडणुकीचेच नव्हे तर देशाच्या पुढच्या वाटचालीचीही दिशा ठरवू पाहात आहेत, असे दिसते. भाजप आणि विशेषत: मोदी यांच्याविरोधात जोमाने उभ्या ठाकलेल्या 'इंडिया आघाडी'च्या मात्र रोजच्या रोज चिरफळ्या उडत चालल्या आहेत. राहुल गांधी यांची 'भारत जोडो न्याय यात्रा' उत्तर प्रदेशात आली असतानाच, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी काँग्रेसपुढे भले मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे.'आधी जागावाटपाचा तिढा सोडवा तरच



आपण या 'यात्रे'त सहभागी होऊ, अशी अटच अखिलेश यांनी घातली आहे आणि त्यासाठी समाजवादी पक्षाने देऊ केलेल्या १७ जागांवर काँग्रेस समझोता करण्याची शक्यता अगदीच धूसर असल्याचे चित्र मंगळवारी समोर आले आहे. खरे तर ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर राहुल गांधी यांनी सुरू केलेल्या या 'यात्रे'त 'इंडिया आघाडी'तील घटक पक्षांनी सहभागी होणे अपेक्षित होते.मात्र, या आघाडीत कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही, अशी स्थिती असल्यामुळे ही 'यात्रे'च्या या अर्ध्याअधिक प्रवासात कोठेही राहुल गांधी यांना सहप्रवासी मिळवता आला नाही. विरोधकांमधील मातब्बरांना त्यांच्यावर आपणच केलेल्या आरोपांची पर्वा न करता, आपल्या छावणीत आणण्याचे काम महाराष्ट्रापासून राजस्थानपर्यंत भाजप जोमाने करत आहे. मध्य प्रदेशातही माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे बडे नेते कमलनाथ यांचे तळ्यात-मळ्यात सुरू आहे. अर्थात, ही भाजपची आक्रमकता आहे की अगतिकपोटी त्यांना हे करावे लागत आहे, हे ज्याचे त्याने ठरवायचे आहे.मात्र, त्यामुळे विरोधी पक्षांचे खच्चीकरण मात्र वेगाने होत आहे. एकीकडे पंतप्रधान प्रचारमोहिमेला देत असलेली वेगळी दिशा आणि त्याचवेळी विरोधी पक्षांना नेस्तनाबूत करण्याची ही खेळी असा दुहेरी डाव भाजप टाकत आहे. त्याचवेळी राहुल मात्र एका वेगळ्याच विश्वात रममाण होऊन 'प्यार बाँटने की' भाषा करत आहेत! खरे तर अखिलेश यादव देऊ करत असलेल्या १७ जागांवर समाधान मानून, काँग्रेसने ते आपल्यासोबत राहतील, असा निर्णय घेतला तर अखिलेश यांच्या सहभागाने राहुल यांच्या यात्रेतून किमान उत्तर प्रदेशात तरी वेगळे चित्र उभे राहू शकते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मागची दहा वर्षे ट्रेलर; पिक्चर अजून बाकी!

## जेपी नड्डा थेट वर्षावर ; महायुती जागावाटप फॉर्म्युला निश्चित होणार?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली भारतात तिसऱ्यांदा भाजपाचे सरकार येणार असून विकसित भारताचे स्वप्न पुढील पाच वर्षात पूर्ण होणार आहे. मागचा दहा वर्षांचा काळ हा तर फक्त ट्रेलर होता, पिक्चर अजून बाकी आहे. पुढची पाच वर्ष हे मागच्या दहा वर्षांपेक्षा भारी असणार आहेत. पुढची पाच वर्ष विकासाची मुहूर्तमेढ रोवणारे असणार आहेत. पुढची पाच वर्ष भारताला आर्थिक महासत्ता बनविणारी असणार आहेत.**



ही पाच वर्ष गरीबी निर्मुलनाच्या अंतिम लढाईचे असणार आहेत, पुढच्या पाच वर्षात जगाला हेवा वाटावा, असा विकास होणार आहे, असा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत केला. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या उपस्थित आज मुंबईत भाजपाचे कार्यकर्ता संमेलन पार पडले. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान मोदींच्या तिसऱ्या टर्मबाबत भाष्य केलं.देवेंद्र फडणवीस आपल्या भाषणात म्हणाले, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन दिवसांपूर्वीच दिल्लीतील राष्ट्रीय अधिवेशनात आपण तिसऱ्यांदा सरकार स्थापन करणार आहोत, हे सांगितलं. सरकार स्थापन करत असताना आमची प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराज आहेत, असंही ते म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. ते छत्रपती झाले, तरीही एकही दिवस ते घरी बसले नाहीत. त्यांनी राज्य भोगले नाही. राज्याभिषेक झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ते स्वराज्याचा विस्तार करण्यासाठी बाहेर पडले. स्वर्गवासी होईपर्यंत छत्रपतींनी देशाची सेवा केली. त्याप्रमाणेच पंतप्रधान मोदींनीही भारताची सेवा करण्याचा संकल्प सोडला आहे.""विकसित भारत तयार करण्यासाठी आम्हाला तिसऱ्यांदा सत्ता हवी आहे. दहा वर्ष तुम्ही मोदींचे राज्य पाहिले. दहा वर्षात बदललेला भारत आणि जगात भारताची बदललेली प्रतिमा पाहिली. भारताचा आत्मसन्मान, स्वाभिमान, आत्माभिमान बदलताना आपण पाहिलं. एक मजबूत भारत आपण पाहिला. भारतामध्ये रस्ते, रेल्वे आणि विमानतळ झाले. भारतामधील गरीबाला कल्याणाच्या योजना मिळाल्या. घर, शौचालय, सिलिंडर मिळालं. भारताच्या तरुणाईला स्टार्टअपसाठी कर्ज मिळालं. अशा अनेक योजना मागच्या दहा वर्षात झाल्या. पुढील पाच वर्ष यापेक्षाही अधिक पटीने भारताची प्रगती होणार आहे", असेही देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा मुंबईत झालेल्या 'क्लस्टर इलेक्शन सुकाणू समिती'च्या बैठकीत प्रदेश भाजपचे पदाधिकारी आणि वरिष्ठ कार्यकर्त्यांशी संवाद साधला. नड्डा यांनी सावरकर सदनला भेट दिली. यानंतर जेपी नड्डा वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी पोहोचले आहेत. नड्डा मुख्यमंत्र्यांसमवेत स्नेहभोजन करणार आहेत.दरम्यान, वर्षा निवासस्थानी जेपी नड्डा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात लोकसभा निवडणुकीसंदर्भात बैठक होणार असल्याची माहिती आहे. या बैठकीत जागावाटप संदर्भात फॉर्म्युला निश्चित होण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी, 'क्लस्टर इलेक्शन सुकाणू समिती'च्या बैठकीत नड्डा यांनी मार्गदर्शन केले. जेपी नड्डा म्हणाले की, पीएम मोदीजींच्या काळात देशात विकासाचं नवं पर्व सुरू झाला आहे. आताच्या सौभाग्यशाली काळाचे आपण साक्षीदार आहोत. आम्ही विक्रम रचण्यासाठी लढाई लढत आहोत. नव्या उमेदीने जोशाने ताकदीने निवडणूक लढवा. 400 प्लस एनडीए आणि 370 प्लस भाजप आपले उद्दिष्ट आहे. ते पुढे म्हणाले की, 370 सोबत आपले भावनिक नातं आहे. काश्मीरला तावडीतून मुक्त करण्याचे काम मोदींनी केले. मला विश्वास आहे की, पुन्हा एकदा मोदी सरकार या कामासाठी तुम्ही परिश्रम कराल. ते पुढे म्हणाले की, काँग्रेसने कर्जमाफीची घोषणा केली पण दिलं काहीच नाही. पंतप्रधान सन्मान योजनेतून लक्षावधी शेतकऱ्यांना मदत केली, त्यात महायुतीने भर टाकून अन्नदात्याचा सन्मान केला. विकासाच्या दृष्टीने पाहिलं तर अटल सेतूची पायाभरणी आणि लोकार्पण मोदींनी केलं. देशातील सर्वात मोठा सागर सेतू मोदींच्या काळात झाला. कोरोनाच्या काळात आम्ही अर्थव्यवस्थेपेक्षा मानवतेकडे अधिक लक्ष दिले. देशातील सांस्कृतिक इतिहासाला गौरवपूर्ण भावनेने पाहिलं जात आहे. आधी गरिबांच्या नावाने मतं मागत त्यांच्यावर अन्याय केला जात होता. आम्ही दहा वर्षात केलेल्या कामाचं रिपोर्ट कार्ड काढलं आहे जे कुणीही केलेलं नाही.

### वाजपेयींच्या भाषणाचा उल्लेख

» ते म्हणाले की, पूर्वीच्या मंडळींनी गावागावात लोकालोकांत भांडणे लावली. मोदींनी सब का साथ सब का विकास ही नीती देशाला शिकवली. नड्डांकडून वाजपेयींच्या भाषणाचा उल्लेख करण्यात आला. 2 खासदार ते जगातील सर्वात मोठा पक्ष हा प्रवास आम्ही पाहिला आहे. गेल्या दहा वर्षात आपण तिमिरातून तेजाकडे आलो आहोत.

# वडिलांच्या तुलनेत पाच टक्केही निष्ठा नाही : शरद पवार

## वळसे पाटील यांच्या मतदारसंघात शरद पवार गटाची सभा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दत्तात्रय वळसे पाटील यांनी माझ्याबरोबर अतिशय प्रामाणिकपणे काम केलं. आंबेगाव तालुक्याने दत्तात्रय वळसे पाटील सारखे नेते दिले. त्यांच्या वारसदारांना (दिलीप वळसे पाटील) आम्ही खूप काही दिलं. विधानसभेचं अध्यक्ष केलं, मंत्रिपदं दिलं, देशाच्या साखर उद्योगाचे अध्यक्षपद दिलं, अनेक संस्थांवर काम करण्याची संधी दिली.**

एवढं दिल्यानंतरही दत्तात्रय पाटील यांच्या ठायी जी निष्ठा होती, त्यातील पाच टक्के निष्ठा सुद्धा दिलीप वळसे पाटील यांच्यात नाही", अशी टीका शरद पवार यांनी आज आंबेगावमधील मंचर येथे घेतलेल्या सभेत केली. दिलीप वळसे पाटील यांच्यावर आरोप करताना पवार म्हटले की, "जर हे लोक आम्हा लोकांबरोबर निष्ठा ठेवत नसतील तर उद्या निवडून दिल्यानंतर जनतेशी निष्ठा ठेवणार नाहीत, एवढंच मला सांगायचे आहे. हे चित्र बदलायचे असेल तर तुम्हा सर्वांना जागं राहावं लागेल."




"डॉ. अमोल कोल्हे यांच्यासारखा खासदार इथल्या जनतेने निवडून दिला. लोकसभेत ते बोलायला लागल्यानंतर इतर खासदार अतिशय शांतपणे त्यांचे म्हणणे ऐकून घेतात. कोल्हेंसारख्या निष्ठावान लोकांची आज गरज आहे. सामान्य माणसाला जागं करून जनतेच्या कामांना प्राधान्य देणाऱ्या नेत्यांची निवड करा", असे आवाहनही शरद पवार यांनी केले.शरद पवार यांचे एकेकाळचे विश्वासू सहकारी असलेले दिलीप वळसे पाटील हे अजित पवार गटाबरोबर गेल्यानंतर अनेकांनी आश्चर्य व्यक्त केलं होतं. आज शरद पवार गटाकडून दिलीप वळसे पाटील यांच्या आंबेगाव या मतदारसंघातील मंचर येथे जाहिर सभा घेण्यात आली. या सभेत 'लाव रे तो व्हिडिओ' म्हणत दिलीप वळसे पाटील यांच्यावर जोरदार टीका करण्यात आली. दिलीप वळसे पाटील यांचे एकेकाळचे सहकारी आणि आता शरद पवार गटात असलेल्या देवदत्त निकम यांनी दिलीप वळसे पाटील यांची जुनी विधानं मोठ्या पडद्यावर दाखवले. रोहित पवार यांच्यामुळे शरद पवार यांची साथ सोडली, असे दिलीप वळसे पाटील म्हणाले होते. त्यामुळे रोहित पवार आज काय बोलतात, याकडेही अनेकांचे लक्ष होते. रोहित पवार म्हणाले की, एकदा लोकसभा निवडणूक आटोपली की या लोकांना भाजपा पक्ष विचारणार नाही. त्यांना विधानसभेला भाजपाच्या चिन्हावर निवडणूक लढवावी लागेल. मागच्या काही काळापासून कांदा निर्यातीवर बंदी आणली गेली. पण निर्यातीवरील बंदी उठविण्यासाठी यांनी एकही पत्र लिहिले नाही. फक्त सरकारमध्ये जाऊन बसण्याने तुमचा विकास होत असेल तर पण जनतेच्या विकासाचे काय? असा सवाल उपस्थित करून रोहित पवारांनी जोरदार टीका केली.

# शेतकरी आंदोलनाला गालबोट?

## » दिल्लीकडे वळविलेला मोर्चा दोन दिवसांसाठी स्थगित

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**शेतमालाला हमीभाव आणि स्वामीनाथ आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी, या मागण्यांसाठी पंजाब आणि हरियाणाचे शेतकरी आंदोलन करत आहेत. शेतकऱ्यांनी चलो दिल्लीचा नारा दिला असून त्यांना हरियाणाच्या सीमेवर रोखण्यात आले आहे. आज हरियाणा सीमेवर आंदोलन सुरू असताना एका २३ वर्षीय युवा शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. पोलिसांनी मात्र ही अफवा असल्याचे सांगून या वृत्ताला दुजोरा दिला नाही. या सर्व घडामोडीदरम्यान शेतकरी नेत्यांनी दिल्लीकडे वळविलेला मोर्चा दोन दिवसांसाठी स्थगित केला आहे. शुक्रवारी संध्याकाळी होणाऱ्या बैठकीत पुढील रणनीती ठरविली जाईल, असे शेतकरी नेत्यांनी जाहीर केले.**



शेतकरी नेते बलदेव सिरसा यांच्या माहितीनुसार, भंटिडा येथील २३ वर्षीय शुभकरण सिंग याचा खनौरी सीमेजवळ बुधवारी मृत्यू झाला. पटियाला मधील राजेंद्र रुग्णालयाचे अक्षिष्ठाता एचएस रेखी यांनी सांगितले की, खनौरी हॉस्पिटलमध्ये तीन जखमींना उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला. रेखी यांनी सांगितले की, ज्या व्यक्तीचा मृत्यू झाला त्याच्या डोक्यावर जखम झाली होती. इतर दोघांची प्रकृती सध्या स्थिर आहे. दरम्यान हरियाणा पोलिसांनी एक्स अकाऊंटवर एक ट्विट टाकत सीमेवरील आंदोलनात मृत्यू झाल्याचा दावा फेटाळून लावला. एक्सवरील पोस्टमध्ये पोलिसांनी लिहिले की, आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार कुणाच्याही मृत्यूची माहिती आमच्यापर्यंत पोहोचलेली नाही. ही फक्त एक अफवा आहे. दाता सिंह – खनौरी सीमेवर दोन पोलीस कर्मचारी आणि एका आंदोलनकर्त्याचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे.शेतकरी नेते सरवन सिंग पंढेर यांनी सांगितले की, दिल्ली मोर्चा आम्ही दोन दिवसांसाठी स्थगित करत आहोत. शुक्रवारी सायंकाळी आंदोलनाची पुढची रणनीती जाहीर केली जाईल. मागच्या रविवारी शेतकरी नेते आणि सरकारमधील मंत्र्यांदरम्यान चर्चेची चौथी फेरीही अपयशी ठरली. त्यानंतर शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा हरियाणाच्या सीमेवरून दिल्लीत शिरण्याचा प्रयत्न सुरू केला. सरकारकडून पुन्हा एकदा पाचव्या फेरीच्या चर्चेचे आवाहन केले आहे.दिल्लीच्या सीमांवर गेल्या काही दिवसांपासून शेतकरी ठाण मांडून बसले आहेत. हे शेतकरी दिल्लीकडे कूच करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु, पोलिसांनी बळाचा वापर करून शेतकऱ्यांना दिल्लीच्या सीमांवरच रोखलं आहे. दरम्यान, आज दुपारी पुन्हा एकदा शेतकऱ्यांनी दिल्लीकडे मार्गस्थ होण्याचा प्रयत्न केला. परंतु, पोलिसांनी शेतकऱ्यांवर अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. पोलिसांनी ड्रोनद्वारे अश्रूधुराचा मारा केला. अश्रूधुराच्या माऱ्यानंतर शंभू सीमेवर तणाव निर्माण झाला आहे. आंदोलक शेतकरी सैरावैरा धावू लागले आहेत. तर या सीमेवर अधिक पोलीस फौजफाटा मागवण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी आज (२१ फेब्रुवारी) सकाळी ११ वाजता दिल्लीत प्रवेश करण्याची घोषणा केली आणि त्यापाठोपाठ पोलिसांनी लावलेले बॅरिकेट्स हटवून दिल्लीकडे मार्गस्थ होण्याचा प्रयत्न केला. परंतु, पोलिसांनी बळाचा वापर करून शेतकऱ्यांना रोखलं. तब्बल १४ हजार शेतकरी १२०० ट्रॅक्टर्स घेऊन शंभू सीमेवर उभे आहेत. परंतु, पोलीस या शेतकऱ्यांना पुढे सरकू देत नाहीयेत. दोन वर्षांपूर्वी शेतकऱ्यांनी असंच एक आंदोलन केलं होतं. तेव्हा हे शेतकरी अनेक महिने दिल्लीत ठाण मांडून बसले होते. मागच्या वेळी झालेल्या चुका यावेळी होणार नाहीत याची काळजी पोलिसांकडून घेतली जात आहे.कोणत्याही परिस्थितीत दिल्लीत जायचंच अशी शेतकऱ्यांची भूमिका आहे. त्यामुळे दिल्लीच्या सीमांवर पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार पंजाब-हरियाणा सीमेवर एकूण १४ हजार शेतकरी जमा झाले असून साधारण १२०० ट्रॅक्टर, २०० कार, १० मिनी बसेसच्या माध्यमातून ते राजधानी दिल्लीकडे रवाना होणार आहेत. तर बॅरिकेट्सचा अडथळा दूर करण्यासाठी शेतकऱ्यांनी ज्या वस्तू आणल्या आहेत.

### शेतकरी नेत्यांना चर्चेचं आमंत्रण

» किमान आधारभूत किमतीसह (एमएसपी) इतर मागण्यांसाठी हजारो शेतकरी दिल्लीकडे मार्गस्थ होणार आहेत. शेतकऱ्यांच्या मागणीवर तोडगा काढण्यासाठी शेतकऱ्यांचे प्रतिनीधी आणि केंद्र सरकार यांच्यात चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या.अशातच केंद्रीय कृषी मंत्री अर्जुन मुंडा यांनी आंदोलकांना नवी ऑफर दिली आहे. कृषीमंत्र्यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की, चार बैठकांनंतर सरकार आता पाचव्या बैठकीत एमएसपीची मागणी, तन (गवत) जाळण्याचा विषय, पिक बदलणे, शेतकऱ्यांवरील दाखल गुन्हे याबाबत चर्चा करण्यासाठी तयार आहे. तसेच याबाबत चर्चेसाठी मी शेतकरी नेत्यांना आमंत्रित करतो. मला वाटतं की, आपण शांतता राखायला हवी.दरम्यान, शंभू सीमेप्रमाणे सिंघू सीमेवरवर १४ हजार शेतकरी जमले आहेत. तर धाबी-गुजरन सीमेवर साधारण ४५०० शेतकरी जमा झाले असून त्यांच्याकडे ५०० ट्रॅक्टर्स आहेत. हे शेतकरी दिल्लीला जाण्यासाठी सज्ज आहेत. शेतमालाला हमीभाव आणि स्वामीनाथ आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी, या मागण्यांसाठी पंजाब आणि हरियाणाचे शेतकरी आंदोलन करत आहेत.

# प. बंगालमध्ये पर्यायी आधार कार्ड आणणार : ममता

## » नागरिकांना येणाऱ्या अडचणींबाबत पंतप्रधान मोदी यांना पत्र

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पश्चिम बंगालमध्ये अनेकांचे आधार कार्ड निष्क्रिय केले जात असल्याचा दावा केला जातोय. आधार कार्डच निष्क्रिय झाल्यामुळे अनेकांना वेगवेगळ्या अडचणींचा सामना करावा लागतोय, असे सांगितले जात आहे. यावरच पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केंद्रातील मोदी सरकारला लक्ष्य केलं आहे.**



तसंच ज्या नागरिकांचे आधार कार्ड निष्क्रिय करण्यात आली आहेत, त्यांना पश्चिम बंगाल सरकारकडून पर्यायी ओळखपत्र देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.पश्चिम बंगालमध्ये नागरिकांना येणाऱ्या अडचणींबाबत ममता बॅनर्जी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एक पत्र लिहिणार आहेत. या पत्रात त्या लोकांना येत असलेल्या अडचणींबद्दल सविस्तर माहिती देणार आहेत. ममता बॅनर्जीनी UIDAL कडून करण्यात येत असलेल्या या कथित कारवाईवर नाराजी व्यक्त केली आहे. तसेच आधार कार्ड निष्क्रिय झाल्यामुळे नागरिकांना येणाऱ्या या अडचणींवर तोडगा म्हणून ज्या लोकांचे आधार कार्ड निष्क्रिय झाले आहे, त्यांना पश्चिम बंगाल सरकारकडून पर्यायी कार्ड देण्यात येईल, असे ममता बॅनर्जींनी सांगितले आहे. तसेच ज्या नागरिकांचे आधार कार्ड निष्क्रिय झालेले आहे, त्यांनी तक्रार नोंदवण्यासाठी एक पोर्टल चालू करण्यात आले आहे. त्यावर तक्रार केल्यास संबंधित नागरिकाला पर्यायी कार्ड देण्यात येईल."ज्या लोकांचे आधार कार्ड निष्क्रिय झालेले आहे, त्यांना मी पोर्टलवर माहिती देण्याचे आवाहन केले आहे. अशा लोकांना आम्ही पर्यायी कार्ड देणार आहोत. या नागरिकांनी आम्ही दिलेल्या कार्डचा फोटो काढून घ्यावा आणि शासनाच्या सर्व योजनांचा लाभ घ्यावा. त्यांच्याकडे आधार कार्ड नसले तरी घाबरून जाऊ नये.

### "हे कसले राजकारण?"

» अशा लोकांना कल्याणकारी योजनांचा लाभ घेता यावा यासाठी आम्ही पर्यायी कार्ड देऊ," असे ममता बॅनर्जी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले."निवडणूक तोंडावर आलेली असताना लोकांचे आधार कार्ड निष्क्रिय करण्यात येत आहेत. हे कोणत्या प्रकारचे राजकारण आहे," अशी टीकादेखील ममता बॅनर्जी यांनी केली. तसेच या प्रकरणासाठी मी कायदेशीर सल्ला घेत आहे, असेदेखील ममता बॅनर्जीनी सांगितले."राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी (एनआरसी) लागू करण्यासाठी आधार कार्ड निष्क्रिय करण्यात येत आहेत. मतुआ आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे लोक भाजपाचा हा डाव ओळखतील अशी आशा आहे.

# रोहितच्या सिंघम अगेनमध्ये अर्जून हा खलनायकाच्या भूमिकेत

बॉलीवूडमध्ये आपल्या आगळ्या वेगळ्या धाटणीच्या अभिनयासाठी प्रसिद्ध असणाऱ्या अर्जुन कपूरचा आता आगामी प्रोजेक्ट हा चाहत्यांच्या कुतूहलाचा विषय आहे. तो प्रख्यात दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या सिंघम अगेनमध्ये दिसणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. एका मुलाखतीमध्ये अर्जुन कपूरनं जी प्रतिक्रिया दिली आहे ती चर्चेत आली आहे. आपला प्रवास, आपले प्रोजेक्ट अन् आगामी काळातील वाटचाल यावर त्यानं दिलेली प्रतिक्रिया त्याच्या विषयी खूप काही सांगून जाणारी आहे. अर्जुनचं म्हणणं आहे की, चाहत्यांचं माझ्यावर असलेलं प्रेम मी समजू शकतो पण माझ्या काही खास भूमिका आहेत. रोहित शेट्टीच्या सिंघम अगेन मध्ये अर्जुन हा खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. त्याच्या सध्या व्हायरल झालेल्या लूक्सची चर्चा आहे. तो म्हणतो की, मला वेगवेगळ्या भूमिका करायला आवडतात ,जर दिग्दर्शकाला वाटत असेल की एखादी वेगळी भूमिका करू शकतो तर मी ती करणारच . सिनेमा हे माझे प्रेम आहे सिनेमासाठी जे त्याला पडद्यावर साकारण्यासाठी निवडलेल्या भूमिकांचा प्रयोग मला करायला आवडते. अर्जुन म्हणतो, “मी कधीही अभिनेता व्हायचं असं ठरवलं नव्हतं. मात्र मी चित्रपटांच्या प्रेमात पडलो



कारण मी आपल्या देशातील लोकांना आनंददायी मनोरंजन देण्यासाठी काही करु इच्छितो. “मला जेव्हा अभिनयाचा अनुभव घ्यायचा होता तेव्हा मला फक्त अभिनयच करायचा होता. कॅमेऱ्याला सामोरे जायचे होते. मला पडद्यावर रोल करण्यासाठी निवडले गेले यावर मी कधीच नाराजही झालो नाही. मला तो आनंद घ्यावासा वाटला. ती प्रक्रिया जाणून घ्यावीशी वाटली. अर्जुन पुढे म्हणतो की, इश्कजादेमध्ये नायकाच्या भूमिकेसाठी त्याची ऑडिशन घेतली जात होती हे त्याला माहिती नव्हतं. “मुख्य भूमिकेत लॉंच होणं ही आदित्य रॉय कपूरची इच्छा होती. त्याला माझं काम आवडलं होतं. मी कधीच ऑडिशन दिले नाही! ही भूमिका मिळाल्यावर मी भारावून गेलो होतो. मला तो दिवस अजूनही आठवतो. तो कदाचित माझ्या आयुष्यातील सर्वात आनंदी दिवसांपैकी एक होता.” अर्जुन म्हणतो मी कधीही कुणापासून असुरक्षिततेची भावना असणारा अभिनेता नव्हतो.

## चर्चा बॉबीचीच!

बॉलीवूड फिल्म इंडस्ट्रीमध्ये मानाचा समजला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कार वितरण सोहळा नुकताच पार पडला असून त्यामध्ये वेगवेगळ्या सेलिब्रेटींना गौरविण्यात आले आहे. यंदाच्या पुरस्कार सोहळ्यात सर्वाधिक चर्चा रंगली ती किंग खान शाहरुख अन् बॉबी देओलची. सोशल मीडियावर बॉबीवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव सुरु केला आहे. ॲनिमल या संदीप रेड्डी वांगाच्या चित्रपटामध्ये बॉबी देओलनं साकारलेल्या नकारात्मक भूमिकेबद्दल त्याला दादासाहेब फाळके पुरस्कारानं गौरविण्यात आले आहे. हा पुरस्कार स्विकारल्यानंतर बॉबी हा भावूक झाल्याचे दिसून आले आहे. तब्बल दीड दशकानंतर बॉबीनं बॉलीवूडमध्ये केलेलं पुनरागमन हे त्याच्या करिअरसाठी चांगलेच लाभदायी ठरताना दिसत आहे.बॉबीनं प्रकाश झा यांच्या आश्रम नावाच्या मालिकेमध्ये निराला बाबाची भूमिका साकारुन प्रेक्षकांची पसंती मिळवली होती. आता या मालिकेचा चौथा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## बैलाबरोबर केलं शूटिंग



'तुजं माजं सपान' ही छोट्या पडद्यावरील लोकप्रिय मालिका आहे. या मालिकेचं वेगळं कथानक प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलं आहे. पण सध्या ही मालिका एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. मालिकेतील नायिका प्राजक्ताने चक्क बैलाबरोबर शूटिंग केलं आहे. अभिनेत्रीच्या या धाडसाचं सध्या मालिकाप्रेमींकडून कौतुक होत आहे. एका वेगळ्या धाटणीची कलाकृती व त्यातून जपली जाणारी सामाजिक आणि कौटुंबिक बांधिलकी यांचं उत्तम उदाहरण म्हणजे 'तुजं माजं सपान' ही सोनी मराठीवरील मालिका. प्रेक्षकांनी उचलून धरलेली ही गावाकडची गोष्ट त्यांना आपलीशी वाटण्याचं कारणच मुळात त्याच्या विषयात आहे. नावीन्यपूर्ण विषय आणि त्याला साजेशी कलाकारांची साथ, या मालिकेला उजवं ठरवते. क्षेत्र मग ते कुठलंही असो स्त्रिया आपली आवड आणि कर्तव्यं यांची सांगड अगदी लीलया घालताना दिसतात. 'तुजं माजं सपान' ही मालिका हेच अधोरेखित करते आहे. सामान्य घरातील प्राजक्ताला रांगड्या मर्दानी खेळाचं, कुस्तीचं पडलेलं स्वप्नं आणि तिला पहिलवान वीरूची असलेली भक्कम साथ यांची अनोखी कथा 'तुजं माजं सपान' या मालिकेच्या माध्यमातून प्रेक्षकांना पाहायला मिळेल.

## कियाराचा पत्ता कट!

प्रसिद्ध अभिनेत्री कियारा अडवाणीची डॉन ३ मध्ये निवड झाली मात्र तिच्या हातून भूल भुलैय्या ३ गेल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. या सगळ्यात कोणत्या अभिनेत्रीला त्या चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली आहे याविषयी चाहत्यांना उत्सुकता आहे. कार्तिक आर्यनचा हॉरर कॉमेडी भूल भुलैय्या ३ हा चर्चेत आला आहे. गेल्या (काही दिवसांपासून त्याविषयी नेटकरी बोलू लागले आहेत. या चित्रपटामध्ये विद्या बालनची इंट्री झाली आहे. मात्र त्यातून धक्कादायक बातमी म्हणजे कियारा अडवाणीचा पत्ता त्यातून कट झाल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. तिच्या जागी बॉलीवूडच्या दुसऱ्या प्रसिद्ध अभिनेत्रीची निवड झाल्याचे सांगण्यात येत आहे.पहिल्यांदा मेकर्सच्या वतीनं सांगण्यात आले होते की, भुलभूलैय्याच्या तिसऱ्या भागामध्ये तब्बू ऐवजी विद्या बालनच्या नावाची घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर आता मुख्य भूमिकेसाठी कियारा अडवाणीचे नाव चर्चेत होते तिच्या ऐवजी बॉलीवूडच्या प्रसिद्ध अभिनेत्रीचे नाव प्रकाशझोतात आले आहे. त्या अभिनेत्रीचे नाव तृप्ती डिमरी असे आहे. ज्यांनी संदीप रेड्डी वांगाचा ॲनिमल पाहिला असेल त्यांना त्या अभिनेत्रीविषयी वेगळं सांगण्याची गरज नाही. भुलभूलैय्याच्या तिसऱ्या भागात बॉलीवूडचा चर्चेतील सेलिब्रेटी दिसणार असल्याचे बोलले जात आहे. या सगळ्यात कार्तिक आर्यननं मोठी घोषणा केली असून त्यानं कियारा ऐवजी त्या चित्रपटामध्ये तृप्ती डिमरी दिसणार असल्याचे सांगितल्याची माहिती आहे.बऱ्याच दिवसांपासून या रिप्लेसमेंटची चर्चा होती. अखेर कियाराच्या नावाला डावलून दुसऱ्या एका नावाला मेकर्सकडून हिरवा कंदील दाखवण्यात आला आहे.

## रकुल प्रीत सिंगचा लग्नानंतरचा पहिला व्हिडीओ

बॉलीवूड अभिनेत्री रकुल प्रीत सिंग आणि अभिनेता जॅकी भगनानी यांचा शाही विवाहसोहळा आज ( २१ फेब्रुवारी ) गोव्यात पार पडला. जॅकी-रकुलच्या लग्नाला कुटुंबीयांसह अनेक बॉलीवूड कलाकार आणि त्यांचे जवळचे मित्र-मैत्रिणी उपस्थित राहिले होते. लग्नसोहळा पार पडल्यावर हे दोघेही पहिल्यांदाच माध्यमांसमोर आले आहेत. ‘वरिंदर चावला’ने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये जॅकीने पांढऱ्या रंगाची शेरवानी परीधान केल्याचं पाहायला मिळत आहे. तर, रकुल प्रीतने लग्नसोहळ्यात बेबी पिंक रंगाचा सुंदर असा लेहेंगा, त्यावर भरजरी दागिने असा आकर्षक लूक केल्याचं या व्हिडीओमध्ये दिसत आहे. लग्नानंतर पहिल्यांदाच ते माध्यमांसमोर आले, तेव्हाचा हा त्यांचा व्हिडीओ आहे. दक्षिण गोव्यातील आलिशान हॉटेलमध्ये रकुल-जॅकीच्या लग्नाचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यांच्या लग्नात वरुण धवन, राज कुंद्रा, भूमी पेडणेकर, शिल्पा शेट्टी, आयुष्मान खुराना, अर्जुन कपूर, डेव्हिड धवन, आदित्य रॉय कपूर, अनन्या पांडे असे अनेक बॉलीवूड सेलिब्रिटी सहभागी झाले होते. या जोडप्यावर आता नेटकऱ्यांसह कलाविश्वातून कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे. दरम्यान, गोव्यात लग्नबंधनात अडकल्यावर आता रकुल व जॅकी लवकरच मुंबईत एका भव्य रिसेप्शन पार्टीचं आयोजन करणार आहेत. याशिवाय दोघांच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर रकुल प्रीत लवकरच ‘इंडियन २’ चित्रपटात झळकणार आहे. तसेच जॅकी ‘बडे मिया छोटे मिया’ या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांचं मनोरंजन करणार आहे. यामध्ये प्रेक्षकांना अक्षय कुमार, टायगर श्रॉफ, सोनाक्षी सिन्हा, पृथ्वीराज सुकुमारन अशी तगडी स्टारकास्ट पाहायला मिळणार आहे.



# विराट कोहलीची क्रिकेटमधून निवृत्ती!

## 'विराट'च्या कॅप्टन्सीमध्ये पाच वेळा जिंकला अंडर 19 वर्ल्डकप

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**काही दिवसांपूर्वीच पार पडलेल्या अंडर 19 वर्ल्डकप च्या सामन्यात टीम इंडियाचा कांगारूंनी मोठ्या शिताफिनं पराभव केला. पण, भारतीय युवा क्रिकेट संघाच्या पोरांनी साऱ्यांची मनं जिंकली. पण जरा मागे वळून पाहिलं तर, यापूर्वी टीम इंडिया पाच वेळा अंडर 19 वर्ल्डकप जिंकली आहे. भारतीय युवा क्रिकेट संघाच्या विजयापैकी एक विजय म्हणजे, 2008 मध्ये अंडर 19 टीम इंडियानं जिंकलेला वर्ल्डकप. हा विजय खास आहे कारण, टीम इंडियाचं रनमशीन म्हणून ओळख असणाऱ्या विराट कोहलीच्यानेतृत्त्वात अंडर 19 क्रिकेट संघानं या विश्वचषकावर आपलं नाव कोरलं होतं.**



पण एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ज्या अंडर 19 संघाचा कर्णधार विराट कोहली होती, त्याच संघात आणखी एक कोहली होता. त्याचं नाव तरुवर कोहली. 2008 मधील अंडर 19 वर्ल्डकप स्पर्धेतील धमाकेदार ओपनर, भारतीय युवा क्रिकेट संघाचा हुकुमाचा एक्का. पण एकेकाळी भारतीय युवा क्रिकेट संघाची आन-बान-शान असणाऱ्या तरुवर कोहलीनं निवृत्ती जाहीर केली आहे. तरूवर कोहली हा प्रथम श्रेणी क्रिकेटचा एक उत्कृष्ट खेळाडू, पण दुर्दैवानं त्याला टीम इंडियासाठी पदार्पण करण्याची संधी मिळाली नाही. तिहेरी शतकही त्याच्या नावावर आहे. नाबाद 307 धावा ही त्याची सर्वोत्तम धावसंख्या आहे. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याची सरासरी 53 होती आणि त्यानं 14 शतकंही झळकावली आहेत. तरुवर कोहली हा उजव्या हाताचा फलंदाज होता. त्यांचा जन्म 17 डिसेंबर 1988 रोजी पंजाबमधील जालंधर येथे झाला. तरुवर उत्तम गोलंदाजीही करायचा. तो उजव्या हाताचा मध्यम गोलंदाजही होता. आयपीएल 2008 मध्ये त्याला राजस्थान रॉयल्सनं तरुवरला विकत घेतलं होतं. त्यानंतर 2009 मध्ये तो किंग्ज इलेव्हन पंजाब (आताचा पंजाब किंग्ज) चा देखील तरुवर कोहली महत्त्वाचा भाग होता. तरूवरचे वडील सुशील कोहली हे सुद्धा स्पोर्ट्स पर्सन होते, पण ते जलतरणपटू होते.तरुवर कोहली आयपीएलमध्ये मात्र आपली छाप सोडू शकला नाही. 2009 - 2010 नंतर त्याचं नाव हळूहळू क्रिकेट जगतातून गायब झालं. त्यानंतर 2013 रणजी ट्रॉफीमध्ये पंजाबकडून खेळताना तिहेरी शतक झळकावून तो पुन्हा चर्चेत आला. तरुवर कोहलीबाबत बोलायचं झालं तर त्यानं फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये 55 सामने खेळले आणि 97 डावांत 4573 धावा केल्या. त्याच्या नावावर 74 विकेट्सही आहेत. याव्यतिरिक्त लिस्ट एमध्ये कोहलीनं 72 सामने खेळताना 1913 धावा केल्यात. फर्स्ट क्लासमध्ये तरुवरनं 14 शतकं आणि 18 अर्धशतकं 53.8 च्या सरासरीनं धावा केल्या आहेत. याव्यतिरिक्त यादीत त्याचं नाव 3 शतकं, 11 अर्धशतकांसह 41 विकेट्सही आहेत. भारतीय युवा क्रिकेट संघाचा हुकुमाचा एक्का. पण एकेकाळी भारतीय युवा क्रिकेट संघाची आन-बान-शान असणाऱ्या तरुवर कोहलीनं निवृत्ती जाहीर केली आहे. तरूवर कोहली हा प्रथम श्रेणी क्रिकेटचा एक उत्कृष्ट खेळाडू, पण दुर्दैवानं त्याला टीम इंडियासाठी पदार्पण करण्याची संधी मिळाली नाही. तिहेरी शतकही त्याच्या नावावर आहे. नाबाद 307 धावा ही त्याची सर्वोत्तम धावसंख्या आहे. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याची सरासरी 53 होती आणि त्यानं 14 शतकंही झळकावली आहेत. तरुवर कोहली हा उजव्या हाताचा फलंदाज होता. त्यांचा जन्म 17 डिसेंबर 1988 रोजी पंजाबमधील जालंधर येथे झाला. तरुवर उत्तम गोलंदाजीही करायचा. तो उजव्या हाताचा मध्यम गोलंदाजही होता. आयपीएल 2008 मध्ये त्याला राजस्थान रॉयल्सनं तरुवरला विकत घेतलं होतं. त्यानंतर 2009 मध्ये तो किंग्ज इलेव्हन पंजाब (आताचा पंजाब किंग्ज) चा देखील तरुवर कोहली महत्त्वाचा भाग होता. काही दिवसांपूर्वीच पार पडलेल्या अंडर 19 वर्ल्डकप च्या सामन्यात टीम इंडियाचा कांगारूंनी मोठ्या शिताफिनं पराभव केला.

### तिहेरी शतकही त्याच्या नावावर

पण, भारतीय युवा क्रिकेट संघाच्या पोरांनी साऱ्यांची मनं जिंकली. पण जरा मागे वळून पाहिलं तर, यापूर्वी टीम इंडिया पाच वेळा अंडर 19 वर्ल्डकप जिंकली आहे. भारतीय युवा क्रिकेट संघाच्या विजयापैकी एक विजय म्हणजे, 2008 मध्ये अंडर 19 टीम इंडियानं जिंकलेला वर्ल्डकप. हा विजय खास आहे कारण, टीम इंडियाचं रनमशीन म्हणून ओळख असणाऱ्या विराट कोहलीच्यानेतृत्त्वात अंडर 19 क्रिकेट संघानं या विश्वचषकावर आपलं नाव कोरलं होतं. तिहेरी शतकही त्याच्या नावावर आहे. नाबाद 307 धावा ही त्याची सर्वोत्तम धावसंख्या आहे. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याची सरासरी 53 होती.

# अखेरच्या चेंडूवर न्यूझीलंडवर ऑस्ट्रेलियाचा रोमहर्षक विजय!

## ऑस्टेलियाने तीन सामन्यांच्या टी-20 मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अखेरच्या चेंडूवर विजयासाठी चार धावांची गरज असताना टीम डेव्हिडने टीम साऊथीच्या गोलंदाजीवर लाँग ऑनच्या दिशेने जोरकस फटका मारला. त्या फटक्यामध्ये इतकी ताकत होती की, क्षेत्ररक्षक ग्लेन फिलिप्सही त्या चेंडूला अडवू शकला नाही. आणि ऑस्ट्रेलियाने न्यूझीलंडवर ६ विकेट राखून रोमहर्षक विजय साकारला.**




तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. लॉकी फर्ग्युसनने या लढतीत प्रभावी मारा केला. पण क्षेत्ररक्षणात खराब कामगिरी केल्याचा फटका यजमान न्यूझीलंड संघाला यावेळी बसला. अष्टपैलू खेळी साकारणारा मिचेल मार्श (१/२१ व नाबाद ७२ धावा) सामन्याचा मानकरी ठरला. न्यूझीलंडकडून ऑस्ट्रेलियासमोर २१६ धावांचे आव्हान ठेवण्यात आले होते. ट्रॅव्हिस हेडच्या पुनरागमनामुळे स्टीवन स्मिथला अंतिम अकरातून बाहेर काढले. हेडसोबत डेव्हिड वॉर्नर सलामी फलंदाज म्हणून मैदानात उतरला. ॲडम मिल्नच्या गोलंदाजीवर हेड २४ धावांवर बाद झाला. तर मिचेल सँटनरच्या गोलंदाजीवर वॉर्नर ३२ धावा काढून तंबूत परतला. त्यानंतर अवघ्या ११ चेंडूंमध्ये २५ धावांची खेळी करणारा ग्लेन मॅक्सवेल लॉकी फर्ग्युसनच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत बाद झाला. २१६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन संघाने १६ षटकांमध्ये ३ बाद १७० धावा केल्या होत्या. मिचेल सँटनरच्या १७व्या षटकांत फक्त तीन धावा दिल्या आणि जॉश इंग्लिसला (२० धावा) बाद केले. १८व्या षटकात लॉकी फर्ग्युसनच्या गोलंदाजीवर आठ धावा काढण्यात आला. ऑस्ट्रेलियासमोर अखेरच्या दोन षटकांत विजयासाठी ३५ धावांची गरज होती. १९वे षटक टाकणाऱ्या ॲडम मिल्नच्या गोलंदाजीवर ऑस्ट्रेलियाने १९ धावा लूटल्या. टीम डेव्हिडने या षटकातील अखेरच्या तीन चेंडूंवर ४,६,६ अशा धावा वसूल केल्या.

### 20व्या षटकांतील थरार

ऑस्ट्रेलियन संघासमोर विजयासाठी अखेरच्या षटकात १६ धावांची आवश्यकता होती. अनुभवी टीम साऊथीकडे चेंडू सोपवण्यात आला. त्याच्या गोलंदाजीवर पहिल्या तीन चेंडूंमध्ये फक्त चार धावा काढण्यात आल्या (वाईड पकडून). त्यामुळे ऑस्ट्रेलियाला अखेरच्या तीन चेंडूंमध्ये १२ धावांची गरज होती. चौथा चेंडू यॉर्कर टाकण्याच्या प्रयत्नात फुलटॉस गेला आणि टीम डेव्हिडने षटकार खेचला. पाचव्या चेंडूवर दोन धावा काढण्यात आल्या. अखेरच्या चेंडूवर चौकार मारून डेव्हिडने ऑस्ट्रेलियाला संस्मरणीय विजय मिळवून दिला. त्याआधी डेव्होन कॉनवे (६३ धावा), राचिन रवींद्र (६८ धावा) यांच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर न्यूझीलंडने २० षटकांत ३ बाद २१५ धावा फटकावल्या.